# संसदीय लोकशाही आणि महिलांचा राजकारणातील सहभाग

**प्रा. तानाजी संभाजी माने**
लोकमान्य महाविद्यालय वरोरा, जी-चंद्रपुर
onlytanaji@gmail.com

***गोषवारा:-***

*भारताने संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. लोकशाही शासन पद्धतीच्या यशस्वीतेसाठी सर्वस्तरीय जनतेच्या सक्रीय सहभागाची आवश्यकता आहे. यातीलच एक महत्त्वपूर्ण भाग असणाऱ्या महिलांच्या सहभागाची ही आवश्यकता आहे. अलीकडील काळात महिला मतदारांची नोंद आणि मतदान प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वृद्धिंगत होणे, ही दिलासादायक एक बाब आहे. आहे मात्र दुसरीकडे महिलांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात संसदेत प्रतिनिधित्व मिळत नाही. अलीकडील तीन लोकसभेचा (15वी, 16वी व 17वी) अपवाद वगळता सुरुवातीच्या लोकसभेत महिला प्रतीनिधित्वाच्या संख्येची टक्केवारी ही दहाच्या आतच राहिली आहे. अशीच काहीशी स्थिती कायदे निर्मितीच्या प्रक्रियेतील महिलांच्या सहभागाबाबतची सांगता येईल. ही स्थिती बदलण्यासाठी महिला वर्ग, राजकीय पक्ष आणि समाज अशा व्यापक स्तरावर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.*

**प्रस्तावना:-**

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपण भारताचा गौरव करतो. लोकशाही शासन पद्धती स्वातंत्र्य समानता बंधुता व न्याय अशा श्रेष्ठ जीवन मूल्यावर आधारित आहे. कोणत्याही देशातील लोकशाही शासन पद्धती यशस्वी व्हायचे असेल, त्या लोकशाहीला स्थैर्यता यायचे असेल तर जनतेचा सहभाग हा सक्रिय असला पाहिजे. त्या देशातील नागरिकांना आपल्या जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. हा सक्रिय सहभाग स्त्री-पुरुष या दोन्ही वर्गाचा अभिप्रेत असतो. मतदान, निवडणूक प्रक्रियेतील सहभाग आणि कायदे निर्मितीच्या प्रक्रियेतील सहभाग हा स्त्री-पुरुषांचा समान व सक्रिय असला पाहिजे. मात्र या प्रक्रियेतील महिलांचा सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. कारण महिलांचा भारतीय समाजव्यवस्थेत असलेला दर्जा. महिलांना समाज जीवनाचे अविभाज्य अंग मानले जाते. सामान्यत: जगाच्या लोकसंख्येपैकी आधी लोकसंख्या ही महिलांची आहे. म्हणूनच त्यांना 'अर्धविश्व' असे संबोधले जाते. स्त्री आणि पुरुष यांची निर्मिती निसर्गानेच केली असली तरी अनादी काळापासून सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात पुरुषांचेच वर्चस्व राहिल्याचे दिसून येते. ती कोमलता, सहनशीलता, त्याग, करुणा आणि ममता इ.चे प्रतीक मानली जाते. "भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला सदैव पूजनीय मानले गेले आहे. 'मातृ देवो भव' असा भाव व्यक्त केला जातो." *(डी.शुक्ला, २००२, पान १५)* असे असले तरी भारतीय स्त्रियांचे कुटुंब आणि समाजातील स्थान काळानुरूप बदलल्याचे दिसून येते. प्राचीन काळात महिलांचा दर्जा हा श्रेष्ठ असा होता. मात्र हा दर्जा मध्ययुगीन काळात राहिला नाही. मध्ययुगातील या दयनीय परिस्थितीमध्ये बदल करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व अंगिकारले. संविधानाच्या उद्देश पत्रिकेचा प्रारंभच लोकशाही विचाराला प्राधान्य देणारा आहे. "आम्ही भारताचे लोक" असा शब्द प्रयोग स्त्री-पुरुषातील समानतेला अभिव्यक्त करतो. यासोबतच संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते

35 अंतर्गत देशातील प्रत्येक नागरिकांसाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत अधिकाराची तरतूद केली आहे. देशातील पुरुषांप्रमाणेच स्त्रिया देखील या अधिकाराचा लाभ घेऊ शकतात. तसेच संविधानाच्या चौथ्या भागात म्हणजे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये देशातील प्रत्येक स्त्री आणि पुरुषांना समान कामासाठी समान वेतन आणि त्यांचे सन्मान, स्वास्थ्य, भौतिक, नैतिक पिळवणूकीपासून संरक्षण आणि स्त्रियांना मातृत्व सहाय्य मिळवून देण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारताच्या संविधानात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार , समानता आणि स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहे. म्हणजेच भारतातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला सक्रिय राजकारणात प्रवेश करण्याचा तथा कायदेमंडळाचे सदस्यत्व प्राप्त करून कायदेनिर्मिती प्रक्रियेत सहभागी होण्याचे स्वातंत्र्य आहे.

मात्र स्वातंत्र्याच्या सात दशकाच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, या स्वातंत्र्याचा उपयोग महिलांपेक्षा पुरुषांनी जास्त घेतला आहे. “अशा स्थितीत काही प्रश्न उपस्थित होतात. ज्या सामाजिक समानतेचा दावा आपले संविधान करते. त्या सामाजिक समानतेची स्थिती प्राप्त होऊ शकली का? भारताच्या राजकीय विकासात महिलांची जितकी भागीदारी आहे तितकी अपेक्षित आहे का? स्वातंत्र्याच्या 50 वर्षानंतर (आता 74 वर्षानंतर) महिला नेतृत्वाची सक्षम पिढी तयार झाली का? इत्यादी या प्रश्नांच्या उत्तराचा आढावा घेतला तर त्याचे उत्तर नकारार्थी येते.” *(शर्मा, २००९, p. ०१)* कारण राजकारणात महिलांचा असलेला मर्यादित सहभाग तथा राजकारणातील स्त्रियांचे असलेले दुय्यम स्थान होय. याउलट राजकारणातील भ्रष्टाचार कमी करावयाचे असेल, राजकारणातील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करावयाचे असेल आणि राजकीय समानता प्रस्थापित करायचे असेल तर अर्धशक्ती असलेल्या नारीशक्तीच्या राजकारणातील प्रवेशाचे स्वागत करणे आवश्यक आहे. एकेठिकाणी स्वामी विवेकानंदांनी म्हटले की, “महिलांची स्थिती सुधारल्याशिवाय जगाचे कल्याण घडणार नाही केवळ एका पंखाच्या आधारे भरारी घेणे कोणत्याही पक्षाला शक्य नाही.” *(कच्छल, २०१६, p. ०४ )*एकंदरीत कुटुंब, राष्ट्र आणि विश्वाच्या बाबतीत नारीशक्तीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी हे विधान पुरेसे ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

i) भारतातील महिलांचा मतदान प्रक्रियेतील सहभागाचा अभ्यास करणे.

ii) भारतातील महिलांना केंद्रीय कायदे मंडळात मिळालेल्या प्रतिनिधित्वाचा अभ्यास करणे.

iii) कायदेमंडळातील कायदे निर्मिती प्रक्रियेतील महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:-**

i) भारतातील महिलांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग हा वाढत आहे.

ii) भारतातील महिलांना केंद्रीय कायदेमंडळात कमी प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले आहे.

iii)कायदेमंडळातील कायदे निर्मिती प्रक्रियेतील महिलांचा सहभाग मर्यादित राहिला आहे.

**अध्ययन विश्व:-**

प्रस्तुत शोधनिबंधात आजपर्यंत झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत (1952 व 1957 स्त्री मतदारांची स्वतंत्र नोंद नाही) महिला मतदारांचा सहभागाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच 1952 च्या पहिल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीपासून ते 2019 च्या 17व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत लोकसभेत महिला प्रतिनिधींचा वाढलेला टक्का याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. सोबतच केंद्रीय कायदेमंडळात कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेत प्रभावीपणे योगदान देणाऱ्या महिला प्रतिनिधींच्या कामगिरीचे अध्ययन करण्याचा प्रयत्न संशोधकांने केला आहे.

**अध्ययन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राच्या आधारावर तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे. अध्ययनासाठी एकूण लोकसभेच्या झालेल्या सर्व निवडणुकामधील महिला मतदारांचा सहभाग, निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या महिला प्रतिनिधींची संख्या आणि कायदे निर्मितीप्रक्रियेतील महिला प्रतिनिधींचा सहभाग इत्यादीचा अभ्यास करण्यासाठी

तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत अध्ययनासाठी गुणात्मक व संख्यात्मक अध्ययन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**तथ्यांचे विश्लेषणात्मक निर्वचन:-**

आधुनिक काळात शासनप्रकारातील अतिशय लोकप्रिय असलेल्या लोकशाहीचा जगातील बहुतांश राष्ट्रांनी स्वीकार केला आहे. या प्रकारात सार्वभौम सत्ता किंवा अंतिम सत्ता ही जनतेकडे असते. जनता आपल्या या सत्तेचा वापर प्रतिनिधीमार्फत करते. स्वतंत्र भारताच्या संविधानाने प्रौढ मतदानाच्या अधिकाराद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना केली आहे. लोकशाही बाबत महात्मा गांधी म्हणतात, "लोकांची उपक्रमशीलता, क्रियाप्रवणता आणि निर्णयक्षमता यांना वाव देणारी प्रजासत्ताकाची जीवनपद्धती आहे. कारण यामध्ये लोकांचे सहभागीत्व ही लोकशाहीची निर्णायक कसोटी आहे." *(गोरे, २०१२, p. ०३ )* म्हणजेच लोकशाहीबाबत महात्मा गांधी असे मानत की लोकशाहीमुळे स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता निर्माण होते. तर याबाबत पंडित नेहरू म्हणतात की, "लोकशाही केवळ राजकीय नसते, केवळ आर्थिकही नसते ती एक मनोवस्था असते...... सर्वांना राजकीय व आर्थिक क्षेत्रात शक्यतो समान संधी मिळणे त्यात अभिप्रेत असते." (भोळे, २००३, p. ७४८ ) पंडित नेहरूंनी लोकशाहीचा विचार संपूर्ण भारताच्या संदर्भात मांडला होता. तसेच भारताच्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही बाबत अशी धारणा होती की, "लोकशाही म्हणजे सहजीवन. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात. सामाजिक समतेशिवाय लोकशाही यशस्वी होणे शक्य नाही." *(भोळे, २००३ , p. ७४८ )* या दृष्टीने डॉ. आंबेडकरांनी 'एक व्यक्ती एक मत' या ऐवजी 'एक व्यक्ती एक मूल्यांचा' स्वीकार केला आहे. वरील महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीच्या व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, लोकशाहीसाठी जनतेचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

**i) मतदान प्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग:-**

आधुनिक काळात प्रातिनिधिक लोकशाहीचे अभिन्न अंग म्हणून निवडणुकीचा उल्लेख केला जातो. निवडणुका म्हटल्या की, मतदानाचा अधिकार आला. भारतीय संविधानकर्त्यांनी प्रौढ मताधिकाराचे तत्त्व स्वीकारले आहे. मतदानाचा अधिकार सर्व भारतीयांना (वय वर्षे 18 पूर्ण) कोणत्याही भेदभावाशिवाय प्राप्त होतो. या सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वामुळे भारतीय लोकशाहीचा पाया अधिक विस्तृत होण्यास मदत झाली. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या महत्वाबाबत भा.ल. भोळे म्हणतात की, "सामान्य माणसाची जागृती ही मताधिकार वापरूनच होऊ शकेल........लोकशाही शिक्षण हे लोकशाहीतील सहभागानेच प्राप्त होत असते आणि प्रौढ-मताधिकार देऊनच हा भाग शक्य होतो." *(भोळे, २००३ , p. ५७ )* एकंदरीत लोकशाहीतील सामान्य नागरिकांच्या सहभागाचा महत्त्वपूर्ण अधिकार म्हणून सर्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा उल्लेख करता येईल. भारतातील महिलांच्या मतदान अधिकारासाठीच्या संघर्षाची सुरुवात स्वातंत्र्य आंदोलनादरम्यान झाली. 1917 साली सर्वप्रथम भारतीय महिलांकडून त्यांच्या राजकीय हक्काची मागणी करण्यात आली. 1935 चा भारत सरकार सुधारणा कायद्यानुसार महिला मताधिकाराच्या संख्येत आणखी वाढ करण्यात आली. 1947 आली भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताने प्रजासत्ताक लोकशाही गणराज्याचा स्वीकार करून सर्व नागरिकास कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय प्रौढ मतदानाचा अधिकार दिला. अशा रीतीने भारतीय संविधानाने महिलांच्या स्वतंत्र, सक्रिय आणि समान राजकीय भूमिकेचा स्वीकार केला.

आजमितीस देशातील एकूण मतदारांची संख्याही 90 कोटी (2019 च्या सतराव्या लोकसभा निवडणुकी वेळीची आकडेवारी) होती. त्यापैकी 43 कोटीहून अधिक महिला मतदार आहेत. महिलांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग हा अलीकडील काळात वाढताना दिसत आहे. कारण महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत देण्यात आलेले आरक्षण, महिला मतदारात निर्माण झालेली जागृकता आणि त्यासाठी

विविध पातळीवरून करण्यात आलेले प्रयत्न इत्यादी. परिणामी भारताच्या राजकारणात महिला मतदार म्हणून महत्त्वपूर्ण घटक ठरत आहेत. अनेक मतदारसंघात महिला मतदार ह्या प्रभावी घटक ठरत आहेत.

**तक्ता क्रमांक 1**

| अ. क्र. | लोकसभा निवडणूक | वर्ष | पुरुष मतदान टक्केवारी | महिला मतदान टक्केवारी | एकूण टक्केवारी | पुरुष व महिला मतदानातील अंतर (टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पहिली | 1952 | -- | -- | 61.2 | -- |
| 2 | दुसरी | 1957 | -- | -- | 62.2 | -- |
| 3 | तिसरी | 1962 | 62.0 | 46.6 | 55.0 | 15.4 |
| 4 | चौथी | 1967 | 66.7 | 55.5 | 61.3 | 11.2 |
| 5 | पाचवी | 1971 | 60.9 | 49.1 | 55.3 | 11.8 |
| 6 | सहावी | 1977 | 66.6 | 54.9 | 60.5 | 11.7 |
| 7 | सातवी | 1980 | 62.2 | 51.2 | 56.9 | 11.0 |
| 8 | आठवी | 1984 | 68.4 | 59.2 | 64.0 | 9.2 |
| 9 | नववी | 1989 | 66.1 | 56.9 | 62.0 | 9.2 |
| 10 | दहावी | 1991 | 61.1 | 51.4 | 61.0 | 10.2 |
| 11 | अकरावी | 1996 | 62.1 | 53.4 | 57.9 | 8.7 |
| 12 | बारावी | 1998 | 62.1 | 53.8 | 57.13 | 8.3 |
| 13 | तेरावी | 1999 | 64.0 | 55.6 | 60.4 | 8.4 |
| 14 | चौदावी | 2004 | 62.15 | 53.64 | 58.7 | 8.5 |
| 15 | पंधरावी | 2009 | 60.0 | 56.0 | -- | 4.0 |
| 16 | सोळावी | 2014 | 67.09 | 65.30 | 67.9 | 1.7 |
| 17 | सतरावी | 2019 | 67.0 | 66.44 | -- | 0.56 |

स्त्रोत:- इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया जनरल इलेक्शन 2019.
लोकराज्य, 2019, पृष्ठ क्र. 56.

वरील तक्त्याचे अध्ययन केल्यास असे लक्षात येते की, तिसरी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक ते 17वी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीतील महिला मतदारांचा सहभाग हा वाढलेला आहे. (पहिल्या व दुसऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पुरुष व महिला मतदानाची स्वतंत्र अशी नोंद झालेली नाही.) 1962च्या तिसऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत महिलांच्या मतदानाची टक्केवारी ही 46.6 टक्के इतकी होती. तर 2019 साली पार पडलेल्या सतराव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महिलांच्या मतदानाचे प्रमाण हे 66.44 टक्के इतके राहिले आहे. यावरून असे सिद्ध होते की, महिलांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग हा वाढत आहे. तसेच लोकसभेच्या प्रत्येक निवडणुकीत स्त्री-पुरुष मतदानाच्या प्रमाणातील अंतर हे कमी-कमी होत

गेल्याचे दिसून येते. यासोबतच महिलांची मतदार म्हणून नोंदणीत सुद्धा वाढ होताना दिसून येते. म्हणजेच 2014मध्ये मतदार यादीतील महिलांचे प्रमाण एक हजार पुरुषामागे 889 इतके होते. 2019 या प्रमाणात एक हजार पुरुषामागे 911 अशी लक्षणीय सुधारणा झाली आहे.

**ii) संसदेतील महिलांचे प्रतिनिधित्व :-**

आधुनिक काळात बहुतांश देशांनी प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतानेही प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केला आहे. "शासकीय यंत्रणा ज्यांना चालवायची असते. अशा आपआपल्या प्रतिनिधींची निवड करण्याच्या बाबतीत घटनेने सर्व नागरिकांना समानता देऊ केलेली आहे." *(बसू, २०१५ , p. २६ )* म्हणजेच राज्यकारभार चालविण्यासाठी विशिष्ट काळासाठी जनतेकडून प्रतिनिधी निवडले जातात. भारतातील केंद्र व राज्य स्तरावरील प्रतिनिधित्वाचा विचार केला तर असे लक्षात येते की, पुरुष आणि महिला प्रतिनिधित्वाच्या प्रमाणात खुप अंतर आहे. ज्याप्रमाणे शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक, प्रशासकीय, लष्करी आणि वैद्यकीय क्षेत्रात सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या महिलांनी शिरकाव करून आपले कार्य कर्तुत्व सिद्ध केले आहे. मात्र याच सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या महिलांना राजकीय क्षेत्र (विशेषत: केंद्र आणि राज्य स्तरावरील) आणखी वर्ज्यच राहिले आहे. म्हणजेच इतर क्षेत्राप्रमाणे महिलांना राजकीय क्षेत्रात आपल्या नेतृत्वाची चुणूक (अपवाद काही महिला नेतृत्व) म्हणावी तशी दाखविता आली नाही. एकीकडे मतदान प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत असतानाच दुसरीकडे महिला मतदारांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही. कौटुंबिक जबाबदाऱ्या, पुरेसे आर्थिक पाठबळ नसणे, राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण, चारित्र्य हननाची भीती, राजकीय पक्षाचा महिला उमेदवारप्रती उदासीनता इ. यासारख्या कारणांमुळे मोठ्या पातळीवरील (केंद्र/राज्य) निवडणुकीच्या राजकारणात महिलांचा सहभाग मर्यादित असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक : 2**

| अ. क्र. | लोकसभा निवडणूक | वर्ष | एकूण सदस्य | महिला उमेदवारांची संख्या | विजयी महिला प्रतिनिधींची संख्या | एकूण महिला प्रतिनिधींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पहिली | 1952 | 499 | 51 | 22 | 4.4 |
| 2 | दुसरी | 1957 | 500 | 70 | 27 | 5.4 |
| 3 | तिसरी | 1962 | 503 | 68 | 34 | 6.8 |
| 4 | चौथी | 1967 | 523 | 66 | 31 | 5.9 |
| 5 | पाचवी | 1971 | 521 | 86 | 22 | 4.2 |
| 6 | सहावी | 1977 | 544 | 70 | 19 | 3.5 |
| 7 | सातवी | 1980 | 544 | 142 | 28 | 5.1 |
| 8 | आठवी | 1984 | 517 | 162 | 44 | 8.1 |
| 9 | नववी | 1989 | 544 | 189 | 27 | 5.2 |
| 10 | दहावी | 1991 | 544 | 307 | 39 | 7.2 |
| 11 | अकरावी | 1996 | 543 | 491 | 40 | 7.4 |
| 12 | बारावी | 1998 | 543 | 271 | 43 | 7.9 |
| 13 | तेरावी | 1999 | 543 | 284 | 49 | 8.8 |
| 14 | चौदावी | 2004 | 543 | 355 | 45 | 8.2 |
| 15 | पंधरावी | 2009 | 543 | 556 | 59 | 10.1 |
| 16 | सोळावी | 2014 | 543 | 668 | 65 | 11.92 |
| 17 | सतरावी | 2019 | 543 | 724 | 78 | 14.3 |

स्त्रोत- Election Commission of India, New Delhi. https://www.thehindu.com/news/national/new-lok-sabha-has-highest-number-of-women-mps/article27260506.ece

वरील तक्त्याचे अवलोकन केल्यास लक्षात येते की, लोकसभेतील महिला प्रतिनिधींची संख्या वाढत आहे. यात थोड्याफार प्रमाणात चढ-उतार झाल्याचे दिसून येते. पहिल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत 51 महिलांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी 22 महिला प्रतिनिधी म्हणून विजयी (4.4 टक्के) झाल्या. तर 2019च्या निवडणुकीत 724 महिला सहभागी झाल्या, त्यापैकी 78 (14.3 टक्के) महिला प्रतिनिधी म्हणून विजयी झाल्या. महिला उमेदवाराची आणि प्रतिनिधीच्या संख्येत वाढ होताना दिसून येते. मात्र लोकसभेचे एकूण सदस्य संख्या, पुरुष उमेदवारांची व प्रतिनिधींची संख्या लक्षात घेता महिलांचा राजकारणातील सहभाग किती कमी आहे याची कल्पना येते.

अशीच स्थिती संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभा सभागृहातील महिला प्रतिनिधीच्या प्रमाणाचे आहे. 1952 पासून 2014 पर्यंतच्या काळात राज्यसभेतील महिला प्रतिनिधीचे प्रमाण हे 14-15 (5.8- 6.9टक्के) ते 30 (11.93 टक्के) इतके राहिले आहे. एकीकडे महिला मतदारांची संख्या आणि महिलांचे मतदान प्रक्रियेतील प्रमाण वाढत असताना देशाचे कायदेमंडळ असणाऱ्या संसदेतील सदस्यत्वाचे प्रमाण हे कमी असल्याचे दिसून येते. 2017 ला प्रकाशित करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालानुसार, संसदेतील महिला संख्येच्या बाबतीत 190 देशांच्या यादीत भारताचा 148 वा क्रमांक लागतो. वरील राज्यसभा आणि लोकसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहातील महिला प्रतिनिधींची आकडेवारी पाहता असे सिद्ध होते की, भारतीय राजकारणात महिलांचा दर्जा हा दुय्यम राहिला आहे. आज राजकारणातील महिला प्रतीनिधित्वाच्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न केले पाहिजेत. त्यातील महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय पक्षांनी महिलांना उमेदवारी देऊन नारीशक्तीचा उपयोग लोकशाहीच्या मजबुतीकरणासाठी करून घेतला पाहिजे. दुसरा घटक म्हणजे महिलांनी सुद्धा सक्षम नेतृत्वाची पिढी घडविण्याच्या दृष्टीने प्रयत्नरत असणे आवश्यक आहे. याकरिता मोठ्या स्तरावरील निवडणुकीत सक्रिय सहभाग नोंदविला पाहिजे.

**iii) कायदे निर्मितीत महिला प्रतिनिधींचा सहभाग:-**

संपूर्ण देशातील जनतेच्या आशा-आकांक्षा लक्षात घेऊन आणि देशाच्या विकासासाठी कायदे निर्मितीचे काम कायदेमंडळ करीत असते. भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यामुळे भारतीय शासन व्यवस्थेत कायदेमंडळाचे स्थान महत्त्वपूर्ण मानले जाते. संसदेतील स्त्री-पुरुष प्रतिनिधित्वाचा विचार केला तर असे लक्षात येते की, महिला प्रतीनिधित्वाचे प्रमाण हे कमी राहिले आहे. असे असले तरी काही महिला प्रतिनिधींनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा संसदीय कामकाजावर उठविला आहे. सन 1964 मध्ये शकुंतला परांजपे या महिला प्रतिनिधींनी नसबंदी व कुटुंब नियोजनावरून संसदेत मूलभूत व धाडसी चर्चा घडवून आणली होती. या बरोबरच सीता परमानंद, स्वामीनाथन या सदस्यांनी ही अनेक विधेयके मांडली आहेत. एकंदरीत भारतीय राज्यव्यवस्थेत मंत्रिमंडळ, विरोधी पक्ष यासारख्या महत्त्वपूर्ण असलेल्या शाखांमधून महिला नेतृत्वाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. श्रीमती इंदिरा गांधी, डॉ. नजमा हेपतुल्ला, जयंती नटराजन, प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज, मीरा कुमारी, सुमित्रा महाजन आणि निर्मला सीतारामन यासारख्या काही महिला प्रतिनिधींचा यात प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

मात्र कायदे निर्मिती प्रक्रियेतील महिला प्रतिनिधींच्या सहभागाचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, कायदेमंडळातील विविध धोरण निर्मितीतील सहभाग हा कमी प्रमाणात राहिला आहे. कारण, " निर्वाचनात्मक राजकारणात यशस्वी होऊन ज्या स्त्रियांना राज्य अथवा केंद्र पातळीवर प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली अशा स्त्री प्रतिनिधींनी देखील आपली विषय कक्षा प्राय: स्त्री प्रश्नापुरतीच

मर्यादित ठेवल्याचे दिसते." (*https://www.loksatta.com/, 2014*) म्हणजेच महिला प्रतिनिधींनी स्त्रीविषयक प्रश्नाच्या बाबतीत जितक्या प्रमाणात परिणामकारक भूमिका घेतल्या तितक्या प्रमाणात देशाचे संरक्षण धोरण, शेती विषयक धोरण, औद्योगिक धोरण आणि व्यापार विषयक धोरणाबाबत परिणामकारक भूमिका घेतल्याचे दिसून येत नाही. यावरुन स्पष्ट होते की, महिला प्रतिनिधींचा कायदे निर्मितीच्या प्रक्रियेतील सहभाग मर्यादित स्वरूपाचा राहिला आहे. हा सहभाग व्यापक करण्यासाठी महिला प्रतिनिधींनी स्त्री-पुरुष समानता, महिलांचे सक्षमीकरण तथा लिंगात्मक भेदभाव यासारख्या विषयाबरोबरच इतरही धोरणाबाबत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष:-

i) महिलांमध्ये वाढती जागरूकता आणि शिक्षण यामुळे अलीकडे महिला मतदारांच्या संख्येत वाढ होत आहे.
ii) लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महिलांचे मतदान करण्याचे प्रमाण वाढले आहे.
iii) लोकसभा टक्केवारीत कमी-कमी होत आहे.
iv) संसदेतील महिला प्रतिनिधित्वाचा संख्येत वाढ होत आहे.
v) महिला मतदारांची एकूण संख्या संसदेच्या दोन्ही सभागृहाचे सदस्य संख्या आणि संसदेतील पुरुष प्रतिनिधींची संख्याच्या तुलनेत महिला प्रतिनिधींचे प्रमाण कमी आहे.
vi) संसदेतील कायदे निर्मितीच्या प्रक्रियेत महिला प्रतिनिधींचा सहभाग हा मर्यादित आहे.

## शिफारशी:-

i) महिला मतदारांच्या संख्येतील वाढ कायम ठेवण्यासाठी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. त्या त्याकरिता विविध पातळीवर कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे.
ii) महिलांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी राजकीय पक्षांनी महिलांना अधिकाधिक उमेदवारी द्यावी.
iii) महिलांचा निर्वाचन प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी महिलांनी स्वतः त्याकरिता पुढाकार घ्यावा.
iv) संसदेतील कायदे निर्मिती प्रक्रियेत महिला प्रतिनिधींनी आपल्या सहभागाची कक्षा ही रुंदावणे आवश्यक आहे.

## संदर्भसूची:-


1. Editoril. (2014, April Saturday). *https://www.loksatta.com/*. Retrieved from https://www.loksatta.com/chaturang-news/women-election-politics-and-democratization-464587/.
2. कच्छल, द. (२०१६, सप्टेंबर ---). संपादकीय. *योजना*, p. ०४.
3. गोरे, स. (२०१२). *भारतीय लोकशाही.* नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन.
4. डी.शुक्ला, आ. त. (२००२). *भारतीय नारी वर्तमान समस्याए और भावी समाधान.* नई दिल्ली: ए. पी. एच. प्लब्लिशिंग कॉपरेशन.
5. बसू, द. द. (२०१५ ). *भारतीय राज्यघटनेची ओळख.* गुरगाव : गुरगाव लेक्झीस नेक्सीस.
6. भास्कर, भ. (n.d.).
7. भोळे, भ. (२००३ ). *आधुनिक भारतातील राजकीय विचार.* नागपूर : पिंपळापुरे अँण्ड कं, पब्लिशर्स.
8. भोळे, भ. (२००३ ). *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण.* नागपूर : पिंपळापुरे अँण्ड कं, पब्लिशर्स .
9. भोळे, भ. (२००३). *आधुनिक भारतातील राजकीय विचार.* नागपूर: पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स.
10. शर्मा, म. (२००९). *भारतीय राजनीति मी महिलाओ का योगदान.* जयपूर: राज पब्लिशिंग हाऊस.